अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– १२/११/२०२५

## —: प्रेसनोट :—

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ३५/२०२५ |
| कलम | कलम ७, ७(अ), १२ भ.प्र.अधिनियम १९८८ |
| अटक आरोपी लोकसेवक | श्री. चंद्रकांत हनमंत वासुदेव, ४० वर्षे, पद- लिपीक/ टंकलेखन, सिटी सिव्हील कोर्ट, माझगांव, मुंबई |
| पाहिजे आरोपी | श्री.एजाजुद्दीन सलाउद्दीन काझी, ५५ वर्षे, पद- अतिरिक्त सत्र न्यायाधीश, दिवाणी सत्र न्यायालय, कोर्ट क्र. १४, माझगांव, मुंबई |
| लाचेची मागणी | रू. २५,००,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | तडजोडीअंती रु. १५,००,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे पत्नीचे कंपनीची जागेचा बळजबरीने ताबा घेतलेबाबत सन २०१५ त्यांचे पत्नीने सन २०१५ मध्ये उच्च न्यायालय येथे याचिका दाखल केली होती. दिनांक २७/०४/२०१६ रोजी उच्च न्यायालयाने नमूद जागेच्या थर्ड पार्टी राईट्स निर्माण स्थगिती दिली होती. तसेच मानवी उच्च न्यायालयाने ज्या केसेस रू. १० कोटी पेक्षा कमी किमतीच्या आहेत त्या सर्व केसेस दिवाणी सत्र न्यायालय येथे वर्ग करण्यात आले असल्याने मा.उच्च न्यायालयाने मार्च २०२४ रोजी नमूद केसमध्ये दिवाणी सत्र न्यायालय, माझगांव, मुंबई येथे कर्मशियल सूट वर्ग केले होते. दिनांक ०९/०९/२०२५ रोजी तक्रारदार यांच्या कार्यालयातील सहकारी हे दिवाणी सत्र न्यायालय, कोर्ट क्र.. १४ येथे हजर होते. त्यावेळी आलोसे यांनी तक्रारदार यांचेशी मोबाईलवर संपर्क करून आलोसे यांनी प्रत्यक्ष भेटून बोलायचे असल्याचे सांगितले. त्यांनी सांगितलेप्रमाणे तक्रारदार यांनी दिनांक १२/०९/२०२५ रोजी लोकसेवक यांची स्टारबक्स कॅफे, चेंबूर येथे जावून भेट घेतली. नमूदवेळी लोकसेवक चंद्रकांत वासुदेव यांनी केसचा निकाल तक्रारदार यांच्या बाजून पारीत करण्याकरीता रू. २५,००,०००/- लाचेची मागणी करून त्यातील रू. १०,००,०००/- त्यांना व उर्वरीत रू. १५,००,०००/- जज यांचेकरीता असे सांगितले. नमूदवेळी तक्रारदार यांनी एवढी रक्कम देण्यास नकार दिला असता, लोकसेवक यांनी विचार करून सांगा असे सांगितले. तदनंतर लोकसेवक हे तक्रारदार यांच्याकडे वारंवार पैशाची मागणी करू लागले, परंतू तक्रारदार यांना लोकसेवकांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १०/११/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे समक्ष हजर राहून तक्रार दिली.<br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १०/११/२०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता, लोकसेवक चंद्रकांत वासुदेव यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांच्या कामाकरीता तडजोडीअंती रू. १५,००,०००/- लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दिनांक ११/११/२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक चंद्रकांत वासुदेव यांना तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम रू. १५,००,०००/- स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. त्यानंतर लोकसेवक चंद्रकांत वासुदेव यांनी लोकसेवक श्री.एजाजुद्दीन सलाउद्दीन काझी, ५५ वर्षे, पद- अतिरिक्त सत्र न्यायाधीश, दिवाणी सत्र न्यायालय, कोर्ट क्र. १४, माझगांव, मुंबई यांना कॉल करून लाचेची रक्कम स्विकारलेबाबत सांगितले असता, त्यांनीदेखील त्यास संमती दर्शवली. म्हणुन १) चंद्रकांत हनमंत वासुदेव, लिपीक/टंकलेखन व २) श्री.एजाजुद्दीन सलाउद्दीन काझी, ५५ वर्षे, पद- अतिरिक्त सत्र न्यायाधीश, दिवाणी सत्र न्यायालय, कोर्ट क्र. १४, माझगांव, मुंबईयांच्याविरूध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७, ७(अ), १२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**तपास अधिकारी :- श्रीमती सुनित दिघे, पोलीस निरीक्षक** **पर्यवेक्षक अधिकारी :- श्री. प्रविण नावडकर, सहाय्यक पोलीस आयुक्त**

मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र गणपत सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( मनिषा झेंडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अथवा लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :- **लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
**टोलफ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८**
**व्हॉट्सअप क्र. :- 8828241064** **मोबाईल ॲप :- www.acbmaharashtra.net**
**वेबसाईट :- acbmaharashtra.gov.in, acbwebmail@mahapolice.gov.in**